लोकमत

# भैरवनाथ विद्यालयात सायबर सुरक्षा जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

कुरुल : अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर आधारित जनजागृती करून हा उपक्रम संपन्न झाला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व संगणकशास्त्र संकुल क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये संगणकशास्त्र संकुलातील विद्यार्थिनी तृप्ती तानाजी पवार व तेजश्री तानाजी पवार यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डी. टी. मोहिते यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.